ePaper
शरमेने मान खाली; बीड प्रकरणाच्या मास्टरमाईंडला सोडणार नाही: अजित पवार



वर्ष - 8 । अंक -164 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 23 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- तुझ्या बॉलने सर्वांनाच बोल्ड केले
- जडेजाची हिंदीत उत्तरं; मीडियाचा संताप
- फुटेज फक्त उमेदवारच पाहू शकतील !
- मोदींना मिळाला कुवेतचा सन्मान!

## पुणे जिल्ह्यातून चार जणांना मंत्रिमंडळात संधी

# सुपरफास्ट विकासाला गती?

## नेमके कोणते 'दादा' पुण्याचे पालक होणार, पुणेकरांमध्ये रंगूल लागलीय चर्चा

। पुणे । महाईन्यूज

**महाविकास आघाडी सत्तेवर असताना अजित पवार पुण्याचे पालकमंत्री होते. महायुती सरकार आल्यानंतर चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री झाले. अजित पवार महायुतीचा भाग झाल्यानंतर पुण्याचे पालकमंत्रिपद हा कळीचा मुद्दा बनला. शेवटी अजित पवारच पुण्याचे पालकमंत्री झाले आणि चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोलापूर व अमरावतीचे पालकत्व देण्यात आले. आता मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झाले आहे. मात्र, पालकमंत्र्यांची यादी अद्याप जाहीर व्हायची आहे. त्यामुळे यंदा नेमके कोणते 'दादा' पुण्याचे पालक होणार याची चर्चा रंगू लागली आहे.**



खातेवाटपानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालयासोबत राज्य उत्पादन शुल्क विभागही आला आहे. त्यामुळे पुण्याच्या विविध प्रलंबित समस्या, योजना आणि विकासकामांसाठी पवार यांच्या माध्यमातून भरघोस निधी उपलब्ध होऊन पुण्याचा सुपरफास्ट विकास होणार का आणि चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून उच्च व तंत्रशिक्षणात पुणे नवी आघाडी घेणार का, याकडे पुणेकरांसह राज्याचे लक्ष लागले आहे. पुण्याच्या वाट्याला चांगले विभाग आल्याने मंत्रिमंडळात पुणेकरांचा दबदबा राहणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

### निधीची चणचण शमणार?

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आलेल्या जबाबदारीमुळे राज्याला आर्थिक शिस्त लावण्याबरोबरच उत्पादन शुल्काच्या माध्यमातून राज्याचा महसूल वाढवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असेल. पुण्याशी संबंधित अनेक योजना, विकासकामांना सध्या निधीची चणचण जाणवत आहे. त्यामुळे पवार राज्याच्या तिजोरीतून पुण्याला झुकते माप देऊन पुण्याच्या विकासाला 'सुपरफास्ट' गती देतील, अशी आशा पुणेकरांना आहे. चंद्रकांत पाटील यांना मागील वेळी सांभाळलेलेच मंत्रालय मिळाल्याने अनेक संस्थांच्या, विद्यार्थ्यांच्या समस्या, प्राध्यापकांच्या समस्यांची त्यांना कल्पना आहे. पूर्वीच्या योजनांमधील सातत्यही कायम राखणे शक्य होणार आहे.

### प्रश्न सुटणार का?

स्वतंत्र नागरी आंतरराष्ट्रीय विमानतळ, 'पीएमआरडीए'चा विकास आराखडा, पुणे मेट्रोचा विस्तार, रिंग रोड, पुणे शहराचा वाढीव पाणीकोटा, 'एमआयडीसी'मधील वाढीव गुंडगिरी, खडकवासला-फुरसुंगी बंदिस्त कालवा, पुणे लोणावळा लोहमार्गाचे चौपदरीकरण, मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन, पुणे-बेंगळुरू ग्रीन कॉरिडॉर, पीएमपी बस खरेदी, इंद्रायणी नदीकाठसुधार आणि रेड झोनमधील बांधकामे असे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुणे जिल्ह्याचे हे चार मंत्री कसे प्रयत्न करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अपेक्षापूर्तीचे आव्हान

माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे क्रीडा व युवककल्याण आणि अल्पसंख्याक विभागाची जबाबदारी सोपवली असून, अपुरी खेळाची मैदाने, क्रीडांगणे, बालेवाडीतील क्रीडानगरीमधील विविध समस्या, खेळाडूंचे विविध प्रश्न सोडवतानाच युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर राहील.

### कामगिरीकडे लक्ष

पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक राज्यमंत्रिपदाचा कार्यभार आहे. पुणे महापालिकेचे अनेक प्रश्न नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहेत. पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विभाजनासह अन्य प्रश्न व इतर प्रश्नांवर त्या काय भूमिका घेणार आणि पुण्याच्या विकासाला कशी गती देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## थंडीचा कडाका सरला, आता हलक्या पावसाची चिन्हे

## 26 डिसेंबरपासून हलक्या पावसाचा हवामान खात्याचा अंदाज

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

गेल्या काही दिवसांत शहर आणि परिसरात वाढलेला थंडीचा जोर आता कमी होऊन किमान तापमानात वाढ होऊ लागली आहे. तसेच पश्चिमी विभोक्ष (वेस्टर्न डिस्टर्बन्स) येऊ घातला असून, २६ डिसेंबरपासून हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे गेल्या आठवड्याभरात पुणे शहर आणि परिसरात थंडीचा कडाका वाढला होता. किमान तापमानात सातत्याने घट होत होती. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे सहा अंश सेल्सियस, तर शिवाजीनगर येथे सात अंश सेल्सियसपर्यंत पारा घसरला होता. त्यामुळे दिवसाही हुडहुडी भरल्याचा अनुभव येत होता. चार दिवसांपूर्वीच यंदाच्या थंडीच्या हंगामातील आतापर्यंतच्या किमान तापमानाची नोंद झाली होती. मात्र, आता पुन्हा किमान तापमानात वाढ होऊ लागली आहे. बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे शनिवारी शहर आणि परिसरात दाट धुके पडले होते. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार रविवारी वडगाव शेरी येथे १९.२ अंश सेल्सियस, मगरपट्टा येथे १९.१, कोरेगाव पार्क येथे १८.५, दापोडी येथे १८.३, शिवाजीनगर येथे १५.५ अंश सेल्सियस, एनडीए येथे १५.३ तापमान



नोंदवले गेले आहे.

ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी म्हणाले, की बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे तापमानात वाढ होऊन थंडीचा जोर कमी झाला आहे. पश्चिमी विक्षोभामुळे २५ डिसेंबरपासून आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. २६ ते २८ डिसेंबर या कालावधीत अतिहलक्या ते हलक्या पाऊस पडू शकतो. तसेच ढगाळ हवामानामुळे दिवसा तापमान कमी राहून वाऱ्यांमुळे गारवा जाणवू शकतो.

# 1 ते 15 जानेवारी ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’!

## विद्यार्थ्यांसाठी सरकारचा नवा उपक्रम!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अलीकडच्या काळात वाचनापासून दुरावत असलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके, वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी १ ते १५ जानेवारी या कालावधीत ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यात सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा असे उपक्रम राबवण्यात येणार आहेत.**



या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्याद्वारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना आणि कार्यपद्धती देण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य कोणतेही पुस्तक वाचायचे आहे. या पुस्तकावर किमान ५०० शब्दांचे परीक्षण किंवा पाच मिनिटांचे सादरीकरण करायचे आहे. वाचनीय पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून उच्च शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यायची आहेत. स्पर्धेतील विजेत्या परीक्षणांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात करावा. स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिक प्रदान करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. उपक्रमासाठी राज्यस्तरीय समिती, विभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती, महाविद्यालयीन स्तरीय समिती नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वाचन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांनी पुस्तक प्रदर्शन आयोजित करावे. ग्रंथालयांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात राज्यातील सहा हजारांहून अधिक महाविद्यालये, ८३ विद्यापीठे, साडेबारा हजार ग्रंथालयांचा सहभाग आहे. शहरी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येईल. विद्यार्थ्यांनी पंधरा दिवसांत एक पुस्तक वाचून त्याचे परीक्षण लिहिणे किंवा सादरीकरण करणे अपेक्षित आहे. राज्यातील दहा विभागातील सर्वोत्कृष्ट प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांची निवड करून त्या तीस विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. वाचन प्रेरणा दिनाअंतर्गत वाचन उपक्रम होत असला, तरी तो उपक्रम आणि वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम यात गुणात्मक फरक आहे. केवळ विद्यार्थ्यांसाठी असलेला हा उपक्रम एक प्रकारे विक्रमच ठरेल, असे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. त्या अंतर्गत वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे आता वाचन संकल्प महाराष्ट्राचा या नव्या उपक्रमाची भर पडल्याचे दिसून येत आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्याद्वारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना आणि कार्यपद्धती देण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

### 26 जानेवारी रोजी पारितोषिक प्रदान

उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य कोणतेही पुस्तक वाचायचे आहे. या पुस्तकावर किमान ५०० शब्दांचे परीक्षण किंवा पाच मिनिटांचे सादरीकरण करायचे आहे. वाचनीय पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून उच्च शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून द्यायची आहेत. स्पर्धेतील विजेत्या परीक्षणांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात करावा. स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिक प्रदान करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. उपक्रमासाठी राज्यस्तरीय समिती, विभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती, महाविद्यालयीन स्तरीय समिती नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# ‘ईव्हीएम’ला दोष देत बसलो नाही

## अजित पवार यांनी बारामती येथे विरोधकांना दिले उत्तर

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपयश आले. मात्र, त्यावेळी आम्ही ‘इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशिन’ला (मतदान यंत्र-ईव्हीएम) दोष देत बसलो नाही. निवडणुकीतील पराभवाची कारणे शोधली आणि जोमाने कामाला लागलो. सर्व घटकांसाठी विविध योजना आणल्या.**

बारामती मतदारसंघातून सलग आठव्यांदा विजयी तसेच राज्याचे सलग सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाल्याच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचा बारामती शहरात नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार अमोल मिटकरी, राज्यसभेच्या खासदार, अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा, चिरंजीव पार्थ पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, शहराध्यक्ष जय पाटील उपस्थित होते.‘लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही सर्व चिंतेमध्ये होतो. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत राज्याने महायुतीच्या बाजूने एकतर्फी निकाल दिला. महायुतीची लाडकी बहीण योजना सर्वात लोकप्रिय ठरली. जे बोलतो तेच करून दाखवतो. महायुतीचा विजय महाविकास आघाडीला सहन झाला नाही. त्यामुळे मतदान यंत्रावर आक्षेप घेण्यास सुरुवात झाली,’ असे अजित पवार यांनी सांगितले. ‘बारामतीकरांनी एक लाखाच्या मताधिक्याने विजय करून जबाबदारी वाढविली आहे.



ही जाबाबदीर मोठी असली तरी, ती समर्थपणे पार पाडण्यासाठी प्रयत्न करेन. अर्थ खाते असल्याने राज्यातील जनतेचा विचार करून अर्थसंकल्प मांडला जाईल. राज्याची आर्थिक शिस्त बिघडणार नाही, याची दक्षता घेतली जाईल,’ असे आश्वासनही त्यांनी दिले. राज्यांमधील सध्या अनेक विमानतळावर नाईट लँडिंग साठी विमानांची गैरसोय होत आहे, त्यामुळे येत्या काळात बारामती, लातूर, यवतमाळ येथे विमानतळावर नाईट लँडिंग ची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले. बारामतीमधील धोबीघाट परिसरात सुसज्ज सभागृह उभारणीच्या अनुषंगाने आराखडा तयार करा, अशी सूचनाही अजित पवार यांनी केली. नागपूर येथील विधीमंडळाचे अधिवेशन आणि मंत्र्यांचे खातेवाटप झाल्यानंतर अजित पवार यांनी रविवारी पहाटे बारामतीमधील विकासकामांची पाहणी केली. मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, कऱ्हा नदी सुशोभीकरण, विद्या प्रतिष्ठान येथील कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र (एआय सेंटर) तसेच श्रीमंत बाबुजी नाईक वाडा येथे सुरू असलेल्या सार्वजनिक विकासकामांची पाहणी करुन संबंधित अधिकांऱ्याकडून माहिती घेतली.बारामती मतदारसंघातून सलग आठव्यांदा विजयी तसेच राज्याचे सलग सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाल्याच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचा बारामती शहरात नागरी सत्कार करण्यात आला.

### मतदान यंत्रावर आक्षेप

आमदार अमोल मिटकरी, राज्यसभेच्या खासदार, अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा, चिरंजीव पार्थ पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, शहराध्यक्ष जय पाटील उपस्थित होते.‘लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही सर्व चिंतेमध्ये होतो. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत राज्याने महायुतीच्या बाजूने एकतर्फी निकाल दिला. महायुतीची लाडकी बहीण योजना सर्वात लोकप्रिय ठरली. जे बोलतो तेच करून दाखवतो. महायुतीचा विजय महाविकास आघाडीला सहन झाला नाही. त्यामुळे मतदान यंत्रावर आक्षेप घेण्यास सुरुवात झाली,’ असे अजित पवार यांनी सांगितले. ‘बारामतीकरांनी एक लाखाच्या मताधिक्याने विजय करून जबाबदारी वाढविली आहे.

## व्यावसायिक भूखंड होणार विकसित

# मोशीत 2 हजार कोटींची गुंतवणूक!

### पीएमआरडीएच्या भूखंडावर आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र होतेय विकसित

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पुढाकाराने सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि व्यापार केंद्र येथे ९६ हेक्टर भूखंडावर सुमारे दोन हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे.**



त्यामध्ये व्यापार केंद्र (कन्व्हेन्शन हॉल), पंचतारांकीत हॉटेल, आर्थिकदृष्ट्या परवडणारी हॉटेल्स, परिषद सभागृह (कॉन्फरन्स हॉल) यासह व्यावसायिक भूखंड विकसित करण्यात येणार आहेत. त्यामुळे येथे जवळपास एक लाख तरुणांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या विकास प्रकल्पांमुळे पिंपरी-चिंचवडच्या वैभव आणि नावलौकीकात भर पडणार आहे.

मोशी येथील पीएमआरडीएच्या भूखंडावर आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र विकसित करण्यात येत आहे. याठिकाणी आजपर्यंत आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन, लष्कराचे शस्त्रास्त्र प्रदर्शन भरविण्यात आले. त्याचबरोबर पीएमआरडीए स्वतः बांधकाम क्षेत्रातील उद्योजकांसाठी येथे दर्जेदार बांधकामांशी संबंधित प्रदर्शन भरवित असते. येथे विविध क्षेत्रांतील अन्य प्रदर्शने देखील भरविण्यात आली आहेत.

प्रदर्शन केंद्रातील केवळ दहा टक्के विकास प्रकल्प आजपर्यंत विकसित केले आहेत. आता उर्वरित विकास प्रकल्प देखील विकसित करण्यात येणार आहेत. पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदर्शन केंद्रातील ९६ हेक्टर जागेवर दोन हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे.

#### पीपीपी तत्त्वावर उभारणी

आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रातील विविध विकास कामांसाठी पीएमआरडीएच्या अंदाजपत्रकात केवळ पाच कोटींची तरतूद आहे. हे प्रकल्प विकसित करण्यासाठी सुमारे दोन हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. स्वउत्पन्नावर हे शक्य नसल्यामुळे पीएमआरडीएने ३१ जानेवारी २०२४ रोजी दोन हजार कोटींच्या मागणीचा प्रस्ताव राज्य सरकारपुढे ठेवला होता.

परंतु त्यावर सकारात्मक तोडगा न निघाल्याने या प्रकल्पातील सर्व गुंतवणूक पीपीपी तत्वावर करण्याचा निर्णय पीएमआरडीएने घेतला आहे. अशा प्रकारचे प्रकल्प विकसित करण्याची क्षमता असणाऱ्या संस्थांना पीएमआरडीएकडून निमंत्रित करण्यात येत आहे.

#### असे राहणार स्वरूप...

पाच हजार प्रेक्षकांची आसनक्षमता असणारा कन्व्हेन्शन हॉल
३५ हजार स्क्वेअर मीटरची तीन सभागृहे तयार करण्यात येणार
एक पंचतारांकित, तर सर्वसामान्यांसाठी तीन हॉटेल बांधणार
उर्वरित मोकळ्या भूखंडावर वाणिज्य वापरासाठी प्लॉटिंग

> मोशीतील अद्ययावत प्रदर्शन व कन्वेंशन सेंटर यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात भर पडणार आहे. या प्रकल्पाबद्दल वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट काढले आहे. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येणार आहे.
> -डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए

#### उद्योजकांनाही सहभाग घेता येणार

मोशी येथील अद्ययावत प्रदर्शन व कन्वेंशन केंद्राच्या जागेवर वाहनतळ, हॉटेल्स व व्यावसायिक गाळ्यांची देखील निर्मिती केली जाणार आहे. उद्योजकांसाठी त्याचा वापर करता येईल, असा पीएमआरडीएचा मानस आहे. त्यांच्याकडून येणाऱ्या निधीतून या प्रकल्पाच्या खर्चाची व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती पीएमआरडीए प्रशासनाने दिली.

#### लाखो तरुणांना नोकरीच्या संधी?

विकास कामाचे विविध टप्पे करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण होण्यासाठी किमान दहा वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. हा संपूर्ण प्रकल्प विकसित झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडसह लगतच्या भागातील तरुणांसाठी किमान एक लाख नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पातील सर्व विकासकामे पीपीपी तत्वावर करण्यात येणार आहे.

---

## भाजी मार्केट अनेक वर्षांपासून धूळखात

### भाजी मंडई सुरु करण्यात यावी, सर्वसामान्य नागरिकांकडून होतेय मागणी

।जुनी सांगवी ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**येथील महापालिकेचे ७६ गाळे असलेले स्व. राजीव गांधी भाजी मार्केट गेली अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत वापराविना धुळखात पडून आहे. सद्यःस्थितीत शेजारीच दोन पावलावर मोकळ्या मैदानावर भाजी मंडई भरते. हा दुराभास पाहता येथील भाजी मंडई सुरू करण्यात यावी. यामुळे येथील मोकळे मैदान धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम व लहानग्यांना खेळासाठी उपयोगात येईल, असे सर्वसामान्यांमधून मत व्यक्त केले जात आहे.**



> गेल्या काही वर्षांत नियोजनाचा अभाव व भाजी विक्रेते व त्यांच्या समस्या सोडविण्यात आल्या नाहीत. भविष्यात येथे भव्य अद्ययावत भाजी मार्केट व व्यापारी संकुल उभारण्याचा आमचा मानस आहे. त्या धर्तीवर विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार व महापालिका प्रशासन यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे. -प्रशांत शितोळे, माजी नगरसेवक

> बंद असलेल्या भाजी मार्केटमध्ये नियमित देखभाल व स्वच्छता राखणे आवश्यक आहे. परिसरात मंदिर, शाळा, पालिकेचे करसंकलन कार्यालय, दवाखाना असल्याने या परिसरात मोठी वर्दळ असते.
> -भानुदास भोरे, ज्येष्ठ नागरिक

#### भाजी विक्रेते म्हणतात

भाजी विक्रेत्यांची संख्या गाळ्यांच्या तुलनेत जास्त प्रमाणात असल्याने गाळे अपुरे पडतात. पूर्वी काही महिने येथे भाजी विक्री व्हायची, मात्र इतर विक्रेते फेरी मारून घरोघरी भाजी विक्री करायचे. त्यामुळे दारावरच भाजी मिळाल्याने मंडईत भाजी विक्री करणाऱ्या भाजी विक्रेत्यांवर यांचा परिणाम व्हायचा. यामुळे सर्वच भाजी विक्रेत्यांनी या भाजी मंडईकडे पाठ फिरवली. याचबरोबर महापालिकेचे गाळ्यांसाठीचे न परवडणारे भाडे. पूर्वी रस्त्याकडेला होणारी भाजी विक्री, अरुंद व अपुरे गाळे या सर्व कारणांमुळे भाजी विक्रेत्यांनी या भाजी मंडईतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. कोरोनाच्या संकट काळात लोकप्रतिनिधी प्रशासन व भाजी विक्रेते असा समन्वय साधून येथील दुरुस्त्या, सुशोभीकरण करून काही महिने ही भाजी मंडई सुरू करण्यात आली. मात्र, पुढे तीच कारणे देत भाजी विक्रेत्यांनी पुन्हा मोकळ्या मैदानावर भाजी विक्री करण्यास सुरुवात केली. औंध, पिंपरीच्या धर्तीवर मोठा ओटा व मोकळा परिसर असावा, सर्व भाजी विक्रेत्यांना सामावून घ्यावे असे भाजी विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

#### सद्यस्थिती

बंद असलेल्या भाजी मार्केटमध्ये नियमित देखभाल व स्वच्छता होत नसल्याने परिसरात अस्वच्छता, सार्वजनिक शौचालय तुंबण्याच्या प्रकारामुळे या परिसराला अवकळा आली आहे. परिसरात या वास्तूला लागूनच महापालिकेचे स्वर्गीय इंदिरा गांधी रूग्णालय आहे. सांगवीसह इतर भागातील रुग्ण नातेवाइकांची या रुग्णालयात मोठी वर्दळ असते. सीमाभिंतीला लागूनच बंद असलेल्या भाजी मार्केटमध्ये नियमित स्वच्छता होत नसल्याने याचा रुग्णालयातील रुग्ण, कर्मचारी व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सध्या काही विक्रेते केवळ भाजी माल ठेवण्यासाठी या गाळ्यांचा व येथील स्वच्छतागृहाचा वापर करतात. उपद्रवी मंडळींचा वावरही या बंद असलेल्या वास्तूत वाढला आहे. शेजारीच असलेले स्व. इंदिरा गांधी रुग्णालय लोकसंख्येच्या तुलनेत नागरिकांना अपूरे पडत आहे.

# चिपपुरवठा साखळी आणि भारत




**जगाला २०२१च्या चिप तुटवड्यामुळे एक महत्त्वाची जाणीव झाली. ती म्हणजे चिपपुरवठा साखळीची कार्यक्षमता, गतिमानता या पारंपरिक परिमाणांच्या बरोबरच तिची लवचीकता (रेझीलियन्स) व शाश्वततेवर (सस्टेनेबिलिटी) भर देण्याचीही नितांत गरज आहे.**

चिपनिर्मितीसाठी तैवान, दक्षिण कोरिया किंवा चीनसारख्या दोनतीन देशांवर अतिविसंबून राहणं यापुढे कोणत्याही देशाला (त्याची सेमीकंडक्टर चिपची वाढती गरज बघता) परवडणारं नाही. ही लवचीकता आणि शाश्वतता साध्य करण्यासाठी मग विविध देशांनी उपाययोजना अमलात आणल्या.अमेरिका (चिप आरेखन व त्यासाठी लागणाऱ्या सॉफ्टवेअर प्रणाली, तसंच इतर उपकरणं), जपान (सब्स्ट्रेट, रेझिस्टर, कॅपॅसिटरसारखा चिपनिर्मितीसाठी लागणारा कच्चा माल), युरोपीय देश (फोटोलिथोग्राफीसारखी चिपनिर्मितीसाठी अत्यावश्यक असणारी उपकरणं) या देशांचं जागतिक चिपपुरवठा साखळीवरचं नियंत्रण अजूनही शाबूत असलं तरीही (काही प्रमाणात इंटेलच्या अमेरिकेतल्या फॅब्सचा अपवाद वगळल्यास) अद्यायावत चिपनिर्मिती आता या देशांत होत नाही. ही परिस्थिती बदलून देशांतर्गत चिपनिर्मिती




वाढवण्यासाठी या देशांनी स्वदेशी चिपनिर्मिती कंपन्यांना प्रोत्साहन तर दिलंच; पण तैवान आणि दक्षिण कोरियाच्या टीएसएमसी, सॅमसंगसारख्या अग्रगण्य सिलिकॉन फॉऊंड्रींनीही अद्यायावत चिप तंत्रज्ञानावर आधारित फॅब उभारण्यासाठी आपल्या देशात यावं, यासाठीही प्रयत्न सुरू केले.या धोरणाची ठळक निष्पत्ती म्हणजे अमेरिका व युरोपीय समुदायानं २०२२-२३ मध्ये जवळजवळ समांतरपणे मंजूर केलेला 'चिप्स ॲक्ट'! या कायद्याअंतर्गत केवळ चिप उत्पादनच नव्हे तर चिप संशोधन व चिपनिर्मितीशी संलग्न अशा उपकरणनिर्मितीसाठी घसघशीत अनुदान आणि करसवलत देण्यात आली. एकट्या अमेरिकेनं या कायद्याची टप्प्याटप्प्याने प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तब्बल पाच हजार कोटी डॉलरची तरतूद करून ठेवली आहे. या कायद्याद्वारे २०३० पर्यंत जागतिक सेमीकंडक्टर उत्पादनात अमेरिकेचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत तर युरोपीय संघाचा वाटा २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. एकेकाळी अमेरिकेनंतर चिपनिर्मिती क्षेत्रातली महासत्ता असलेल्या जपानमध्ये आता काही मेमरी आणि ॲनालॉग चिप सोडल्यास फारशी चिपनिर्मिती होत नाही. या क्षेत्रात आपले पाय पुन्हा रोवण्यासाठी जपानी शासकांनी एकेकाळी जपानच्या सेमीकंडक्टर क्षेत्राचा चेहरा असणाऱ्या 'सोनी'ची मदत घेतली आहे.टीएसएमसी आणि सोनीच्या संयुक्त भागीदारीत जपानमध्ये सिलिकॉन फाऊंड्री उभारण्यासाठी सरकारतर्फे प्रचंड पतपुरवठा केला जातो आहे. चिपनिर्मितीत आपलं महत्त्व आजही राखून असलेला सिंगापूरही यात मागे नाही. शासनानं दिलेलं अनुदान आणि करसवलतींचा लाभ उठवत अमेरिकेची 'ग्लोबल फाऊंड्रीज' तिथे फॅब उभारण्यासाठी ४०० कोटी डॉलरची गुंतवणूक करत आहे. कोविड आपत्ती आणि त्याच सुमारास उभं ठाकलेलं चिप टंचाईचं संकट यातून धडा घेऊन गेल्या तीन-चार वर्षांत पाश्चिमात्य देश तसंच जपान, ऑस्ट्रेलियासारख्या प्रगत देशांनी चीनवरचं आपलं अवलंबित्व कमी करण्याचा पद्धतशीरपणे प्रयत्न सुरू केला आणि त्याचा व्हिएतनाम, मलेशियासारख्या आग्नेय आशियाई देशांनी पुरेपूर लाभ उठवायला सुरुवात केली आहे. आता प्रश्न हा उरतो की महासत्तापदी जाण्याची आस बाळगून असलेला आपला देश यातून काही बोध घेत आहे का? 'येत्या दशकभरात भारत चिपनिर्मितीचे एक प्रमुख केंद्र बनेल 'असा आशावाद गेल्या दोनएक वर्षांत सरकारी पातळीवर अनेकदा व्यक्त झाला आहे. त्याचे प्रतिबिंब माध्यमांतही उतरलेलं दिसतं. मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन, टाटा, अदानी-टॉवर हे उद्योगसमूह गुजरात/ तामिळनाडू/ कर्नाटक/ महाराष्ट्र अशा राज्यांत सेमीकंडक्टर फॅब उभारण्यासाठी लाखो कोटी रुपये गुंतवणार असल्याच्या बातम्या आपण ऐकत आहोत.

## प्रासंगिक »

### कोणते आंबेडकर?


***डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फक्त घटनाकार म्हणून डोक्यावर घ्यायचे आणि त्यांचे अन्य विचार चातुर्याने पायदळी तुडवायचे ही खरी आजची 'फॅशन'...***

लोकसभा निवडणुकीत 'संविधाना'चा फटका बसल्यापासून भाजपने राज्यघटना आणि त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपलेसे करण्याचा चंगच बांधलेला दिसतो. हे राजकीयदृष्ट्या स्तुत्यच. त्यामुळे संसदेच्या या वर्षीच्या शेवटच्या अधिवेशनात संविधान, घटना आदी मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. अलीकडे सांसदीय चर्चेत विद्वान, अभ्यासकांस आकर्षक वाटेल असे फारच काही क्वचित असते. सगळा आरोप-प्रत्यारोपांचा उथळ खेळ. त्यातूनच 'आंबेडकर, आंबेडकर' करण्याची हल्ली कशी 'फॅशन' आहे असे काही बोलले गेले. ते सध्याच्या काळास साजेसेच म्हणायचे. आरोप-प्रत्यारोपाचा खेळ शून्य बौद्धिक संपदेवरही मोठ्या जोमाने खेळता येतो आणि फुप्फुसांच्या ताकदीवर जिंकताही येतो. जितकी जास्त फुप्फुसे तितकी विजयाची शक्यता अधिक. त्यामुळे संसदेत जे काही झाले.

भाजपला असे वाटत होते की, त्यांनी दहा वर्षे जो खेळ केला तो इतरांना करता येणार नाही. पण त्यांच्याच आयुधाने काँग्रेसने भाजपवर वार केला. हा अचानक झालेला वार भाजपला सहन झाला नाही. भाजपने आत्तापर्यंत काँग्रेस नेत्यांच्या चित्रफिती 'व्हायरल' केल्या नव्हत्या का?

# शहांची कोंडी आणि भाजप सैरावैरा!

राहुल गांधी हे तर भाजपसाठी समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याचे हुकमी गिऱ्हाईक होते. भाजपने राहुल गांधींची जेवढी टिंगल केली तेवढी कोणाचीही केली नसेल. त्यांची टिंगल करण्यात भाजपला मजाही येत होती. हिंदीमध्ये आपले विचार नीट लोकांपर्यंत पोहोचवता येत नाहीत ही राहुल गांधींची मोठी अडचण आहे. मग, ते जाहीर सभेतील भाषण असो वा लोकसभेतील. या भाषणांमध्ये शब्दांचा अचूक वापर होत नाही. मग, त्यातून भाजपचे नेते खोट काढून राहुल गांधींची चेष्टा करतात. पण, या वेळी काँग्रेसने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वाक्यात खोट काढून त्यांना कोंडीत पकडले. त्यांच्या राज्यसभेतील भाषणातील वाक्ये बरोबर चिमटीत पकडली आणि ती व्हायरल केली. शहांचे म्हणणे होते की, वाक्यांची मोडतोड केली, चुकीचा अर्थ काढला गेला. पण, शहा इतके स्पष्ट बोललेले आहेत की त्याचा याहून चुकीचा अर्थ काढला जाणे अशक्य आहे. शहा काय म्हणाले हे पूर्ण ऐकले तर समजेल. त्यांना जे म्हणायचे होते तेच



त्यांनी म्हटलेले आहे. त्यामध्ये चुकीचा अर्थ काढण्यासाठी कोणतीही जागा नव्हती. काँग्रेसने थेट शहांवरच हल्लाबोल केल्यामुळे भाजपची धावपळ सुरू झाली होती. शहांची चित्रफीत व्हायरल झाल्यानंतर भाजपचे नेते अक्षरशः सैरावैरा धावत असल्याचे पाहायला मिळाले. संसदेचे हिवाळी अधिवेशन संपता संपता हा सामना काँग्रेसने निर्विवादपणे जिंकला हे मान्य करावे लागेल. नंतरचा भाजपचा आक्रमकपणा हा निव्वळ चेहरा वाचवण्याचा प्रकार होता!संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये भाजप काँग्रेसवर एक-एक वार करत चालला होता. काँग्रेसने संविधानावर चर्चा मागितल्यावरच काँग्रेसचा पराभव दिसू लागला होता. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाषणातून 'तलवार' फिरवली की काँग्रेसच्या सर्व आवेशावर पाणीच पडले असते. खरेतर मोदींच्या भाषणानंतर तसे होऊ लागले होते. मोदींचे भाषण भाजपच्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षांना खरे उतरणारे होते. भाजपचे नेतेही सुखावले होते. मोदींनी नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, राहुल गांधी, सोनिया गांधी अशा सर्व गांधींना आरोपीच्या कोठडीत उभे केले होते. मोदींच्या भाषणांमध्ये गांधी कुटुंबाला शत्रू करण्याचे यशस्वी सूत्र असते, त्यांनी ते अचूकपणे वापरले होते. संविधानावरील चर्चेच्या उत्तरात काँग्रेस नावाच्या शत्रूला पुन्हा दोन दणके देत तो जिवंत राहील याची दक्षता घेतली होती. मोदींनी त्यांचे काम योग्य पद्धतीने केले होते. राज्यसभेत या खेळाचा अलगदपणे शेवट होणे बाकी होते. ही जबाबदारी मोदींनी विश्वासू सेनापती शहांवर टाकली होती आणि ते निश्चिंत झाले होते. पण, या सेनापतीकडून बेसावध क्षणी नको त्या वाक्यांचा बाण मारला गेला. मग दोन दिवस भाजपला स्वतःला सावरण्यासाठी उसंत मिळाली नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# निवडणूक लढायला सांगायचं नव्हतं ना?

## मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने भुजबळांनी व्यक्त केली नाराजी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात अनेक मोठ्या नेत्यांना स्थान देण्यात आलेलं नाही. काही नेत्यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आल्यामुळे काहींनी नाराजी व्यक्त केली आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांना देखील मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे छगन भुजबळ हे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून देखील दाखवली आहे. एवढंच नाही तर छगन भुजबळ यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत पुढील भूमिकेबाबत चर्चा केली.**





दरम्यान, आज राज्यातील ओबीसी नेत्यांबरोबर छगन भुजबळ यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली. तसेच अजित पवारांसह राष्ट्रवादीच्या नेत्यांना काही सवाल केले आहेत. तसेच मग मला निवडणूक लढायला सांगायचं नव्हतं ना?, असं म्हणत छगन भुजबळ यांनी थेट अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला.पत्रकार परिषदेत छगन भुजबळ यांना तुमची पुढची भूमिका काय असेल? असा प्रश्न विचारला. त्यावर बोलताना भुजबळ म्हणाले, "मला माझी भूमिका घ्यायला आणखी वेळ लागेल. त्यासाठीच मी सर्वांशी चर्चा करत आहे", असं त्यांनी म्हटलं. यावेळी काही वरिष्ठांना मंत्रिपद दिलं नाही, कारण तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची असते, या अजित पवारांच्या विधानासंदर्भात प्रश्न विचारला असता भुजबळ म्हणाले, "तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची ही चांगली गोष्ट आहे. मात्र, तरुणांना संधी द्यायची यासाठी व्याख्या ठरवली गेली पाहिजे. त्यामध्ये किती वर्षांपर्यंत तरुण म्हणायचं? मग ६७ ते ६८ वर्षांपर्यंतही तरुण म्हणायचं का? हे ठरवलं पाहिजे", असा टोला छगन भुजबळ यांनी अजित पवारांना नाव न घेता लगावला. भुजबळ पुढे म्हणाले, "मला अगोदर सांगितलं असतं की तुम्ही निवडणुकीत उभं राहू नका, मी राहिलो नसतो. पाच महिन्यांपूर्वी मला लोकसभेत पाठवत होते, तेव्हा माझी संपूर्ण तयारी झाली. मात्र, तेव्हाही मला थांबवावं लागलं. त्यानंतर राज्यसभेची निवडणूक आली तेव्हा म्हटलं मला राज्यसभेवर पाठवा. तेव्हा मला म्हणाले की, तुमची गरज राज्यात जास्त आहे. मग आता माझी गरज कमी झाली का? असं होतं तर मला निवडणूक लढवायला सांगायचं नव्हतं ना? आज माझ्या मतदारसंघात एक वेगळं वातावरण निर्माण झालं ते झालं नसतं. आता सर्व झाल्यानंतर मला सांगतात की राज्यसभेवर जा. मी आता राज्यसभेत जायचं याचा अर्थ मी विधानसभेचा राजीनामा द्यायचा. मग मी राजीनामा कसा देऊ?", असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.ओबीसींच्या बैठकीबाबत बोलताना भुजबळ म्हणाले, "आज ओबीसी नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीनंतर मला त्यांनी सांगितलं की असं कसं होऊ शकतं? तुम्ही राज्याचं ओबीसींचं नेतृत्व करता. ओबीसींच्या प्रश्नांसाठी तुम्ही राज्यात आणि विधानसभेत प्रश्न मांडले. आता तुम्हाला मंत्रिमंडळातून बाहेर ठेवलं, याचा अर्थ यामागे काहीतरी गौडबंगाल आहे. कारण तुम्ही नेहमीच ओबीसींच्या मुद्यांची पाठराखण केली. त्यामुळे आम्हाला भिती वाटते की हे वेगळं काहीतरी आहे. त्यामुळे आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आता पुढे काय करायचं? ते आपण बसवून ठरवा. असं ओबीसी नेत्यांनी सांगितलं", असं छगन भुजबळ यांनी सांगितलं.

दरम्यान, आज राज्यातील ओबीसी नेत्यांबरोबर छगन भुजबळ यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली. तसेच अजित पवारांसह राष्ट्रवादीच्या नेत्यांना काही सवाल केले आहेत. तसेच मग मला निवडणूक लढायला सांगायचं नव्हतं ना?, असं म्हणत छगन भुजबळ यांनी थेट अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला.पत्रकार परिषदेत छगन भुजबळ यांना तुमची पुढची भूमिका काय असेल? असा प्रश्न विचारला. त्यावर बोलताना भुजबळ म्हणाले, "मला माझी भूमिका घ्यायला आणखी वेळ लागेल. त्यासाठीच मी सर्वांशी चर्चा करत आहे", असं त्यांनी म्हटलं. यावेळी काही वरिष्ठांना मंत्रिपद दिलं नाही, कारण तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची असते, या अजित पवारांच्या विधानासंदर्भात प्रश्न विचारला असता भुजबळ म्हणाले, "तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची ही चांगली गोष्ट आहे. मात्र, तरुणांना संधी द्यायची यासाठी व्याख्या ठरवली गेली पाहिजे. त्यामध्ये किती वर्षांपर्यंत तरुण म्हणायचं? मग ६७ ते ६८ वर्षांपर्यंतही तरुण म्हणायचं का? हे ठरवलं पाहिजे.

### ओबीसींच्या बैठकीत काय ठरलं?

मला अगोदर सांगितलं असतं की तुम्ही निवडणुकीत उभं राहू नका, मी राहिलो नसतो. पाच महिन्यांपूर्वी मला लोकसभेत पाठवत होते, तेव्हा माझी संपूर्ण तयारी झाली. मात्र, तेव्हाही मला थांबवावं लागलं. त्यानंतर राज्यसभेची निवडणूक आली तेव्हा म्हटलं मला राज्यसभेवर पाठवा. तेव्हा मला म्हणाले की, तुमची गरज राज्यात जास्त आहे. मग आता माझी गरज कमी झाली का? असं होतं तर मला निवडणूक लढवायला सांगायचं नव्हतं ना? आज माझ्या मतदारसंघात एक वेगळं वातावरण निर्माण झालं ते झालं नसतं. आता सर्व झाल्यानंतर मला सांगतात की राज्यसभेवर जा. मी आता राज्यसभेत जायचं याचा अर्थ मी विधानसभेचा राजीनामा द्यायचा. मग मी राजीनामा कसा देऊ?

# राज -उद्धव भेटीवर शिवसेनेची पहिली प्रतिक्रिया

## राज आणि उद्धव ठाकरे भेटीवर काय म्हणाले संजय शिरसाट?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघंही आज एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? या चर्चा कायमच सुरु असतात. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून नवा पक्ष स्थापन केल्यापासून या चर्चांना सुरुवात झाली आहे.**

दरम्यान २०१९ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक आली होती तेव्हा राज ठाकरे हे महाविकास आघाडीबरोबर होते. मात्र २०२२ नंतर राज ठाकरे महायुतीबरोबर गेले. आता आज एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. याबाबत आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने प्रतिक्रिया दिली आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही नेते एका लग्नाच्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. या दोघांमध्ये चर्चाही झाली. ती काय होती त्याचा तपशील समजू शकलेला नाही. मात्र आता हे दोन नेते एकत्र आल्याने महापालिका निवडणुकीच्या आधी काही सूत्रं बदलतील का या चर्चांना मुंबईतल्या राजकीय वर्तुळात हे दोन बंधू आणि राजकीय नेते एकत्र



येतील अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मुंबईतल्या दादर या ठिकाणी असलेल्या राजे शिवाजी महाविद्यालयात लग्नाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी हे दोन्ही नेते सहकुटुंब पोहचल्याचं पाहण्यास मिळालं. राजकीयदृष्ट्या एकमेकांमध्ये शत्रुत्व सुरु असलेले हे दोन नेते एकत्र आल्याने साहजिकच राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या. दरम्यान एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.मला मंत्रिपद मिळाल्याचा आनंद आहे. एकनाथ शिंदेंची प्रतिमा कॉमन मॅन अशी आहे त्यानुसारच आम्हा सर्वांचं काम करण्याचं ध्येय आहे. मला सामाजिक न्याय खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या खात्यात अनेक आव्हानं आहेत ती आव्हानं पेलण्याचा प्रयत्न मी करणार आहे. आता आमचे दौरेही सुरु होतील. सोमवारी उदय सामंत आणि मी बीड येथील मस्साजोग या ठिकाणी जाणार आहोत.

### वाढत्या गुन्हेगारीला आळा बसेल

तसंच परभणीचा दौराही आम्ही करणार आहोत. मराठवाड्यात ज्या घटना घडल्या आहेत त्या ठिकाणी आम्ही पोहचून कुटुंबियांची भेट घेणार आहोत. वाढत्या गुन्हेगारीला आळा कसा बसेल याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत कणखर भूमिका घेतली आहे असं संजय शिरसाट म्हणाले. यानंतर त्यांनी राज आणि उद्धव ठाकरे भेटीवर भाष्य केलं.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची लग्नात भेट झाली म्हणून राजकीय वातावरण तापण्याचं काही कारण नाही. जर तसं काही करायचं असतं तर राज ठाकरेंनी विधानसभेच्या वेळी केलं असतं.

# मोदींना मिळाला कुवेतचा सर्वोच्च सन्मान!

## ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर प्राप्त करणारे पहिले भारतीय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कुवेत दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. कुवेतचे अमीर शेख मिशाल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांनी त्यांना हा सन्मान दिला. हा सन्मान मिळवणारे मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. मोदींना कोणत्याही देशाकडून मिळणारा हा 20 वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे.**



हा कुवेतचा नाइटहूड ऑर्डर आहे. हा पुरस्कार राष्ट्रप्रमुख आणि परदेशी राज्यकर्ते आणि परदेशी राजघराण्यातील सदस्यांना मैत्रीचे प्रतीक म्हणून दिला जातो. यापूर्वी हा पुरस्कार बिल क्लिंटन, प्रिन्स चार्ल्स आणि जॉर्ज बुश या परदेशी नेत्यांना देण्यात आला आहे. त्याचवेळी पीएम मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर दोन्ही देशांमधील संभाषणाची पोस्ट केली. पंतप्रधानांनी लिहिले: कुवेतच्या अमीरांसोबत छान भेट झाली. आम्ही फार्मास्युटिकल्स, आयटी, फिनटेक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा या मुद्द्यांवर चर्चा केली. आम्ही आमची भागीदारी धोरणात्मक पातळीवर नेली आहे आणि मला आशा आहे की आमची मैत्री आगामी काळात आणखी घट्ट होईल. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदींचे अमीर यांच्या राजवाड्यातील बायन पॅलेसमध्ये स्वागत करण्यात आले, जिथे त्यांना गार्ड ऑफ ऑनरने सन्मानित करण्यात आले. पंतप्रधान मोदी शनिवारी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर पोहोचले. पंतप्रधान मोदींनी शनिवारी कुवेतमध्ये काम करणाऱ्या भारतीय मजुरांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यांची प्रकृती जाणून घेतली आणि एकत्र नाश्ताही केला. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी कुवेतमध्ये अनिवासी भारतीयांना संबोधित केले होते. अनिवासी भारतीयांना संबोधित करताना मोदी म्हणाले की, 43 वर्षांनंतर एक भारतीय पंतप्रधान कुवेतला आला आहे. भारतातून यायचे असेल तर 4 तास लागतात, पंतप्रधानांना 4 दशके लागली. कुवेतमधील लोकांना प्रत्येक सण साजरा करण्याची सुविधा असल्याचे मोदी म्हणाले. पण मी तुमचा गौरव करण्यासाठी आलो आहे. पंतप्रधान मोदींच्या आधी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना 1981 मध्ये कुवेतला गेल्या होत्या. 4 दशकांनंतर भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच कुवेत दौरा आहे. विमानतळावर मोदींचे रेड कार्पेटवर स्वागत करण्यात आले.ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर हा कुवेतचा नाइटहूड ऑर्डर आहे. हा पुरस्कार राष्ट्रप्रमुख आणि परदेशी राज्यकर्ते आणि परदेशी राजघराण्यातील सदस्यांना मैत्रीचे प्रतीक म्हणून दिला जातो. यापूर्वी हा पुरस्कार बिल क्लिंटन, प्रिन्स चार्ल्स आणि जॉर्ज बुश या परदेशी नेत्यांना देण्यात आला आहे. त्याचवेळी पीएम मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर दोन्ही देशांमधील संभाषणाची पोस्ट केली. पंतप्रधानांनी लिहिले: कुवेतच्या अमीरांसोबत छान भेट झाली. आम्ही फार्मास्युटिकल्स, आयटी, फिनटेक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा या मुद्द्यांवर चर्चा केली. आम्ही आमची भागीदारी धोरणात्मक पातळीवर नेली आहे आणि मला आशा आहे की आमची मैत्री आगामी काळात आणखी घट्ट होईल. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदींचे अमीर यांच्या राजवाड्यातील बायन पॅलेसमध्ये स्वागत करण्यात आले, जिथे त्यांना गार्ड ऑफ ऑनरने सन्मानित करण्यात आले. पंतप्रधान मोदी शनिवारी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर पोहोचले. पंतप्रधान मोदींनी शनिवारी कुवेतमध्ये काम करणाऱ्या भारतीय मजुरांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला, एकत्र नाश्ताही केला. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी कुवेतमध्ये अनिवासी भारतीयांना संबोधित केले होते. अनिवासी भारतीयांना संबोधित करताना मोदी म्हणाले की, 43 वर्षांनंतर एक भारतीय पंतप्रधान कुवेतला आला आहे. भारतातून यायचे असेल तर 4 तास लागतात, पंतप्रधानांना 4 दशके लागली. कुवेतमधील लोकांना प्रत्येक सण साजरा करण्याची सुविधा असल्याचे मोदी म्हणाले. पण मी तुमचा गौरव करण्यासाठी आलो आहे.

### आमची मैत्री आणखी घट्ट होईल

पंतप्रधान मोदींच्या आधी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना 1981 मध्ये कुवेतला गेल्या होत्या. 4 दशकांनंतर भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच कुवेत दौरा आहे. विमानतळावर मोदींचे रेड कार्पेटवर स्वागत करण्यात आले.हा कुवेतचा नाइटहूड ऑर्डर आहे. हा पुरस्कार राष्ट्रप्रमुख आणि परदेशी राज्यकर्ते आणि परदेशी राजघराण्यातील सदस्यांना मैत्रीचे प्रतीक म्हणून दिला जातो. यापूर्वी हा पुरस्कार बिल क्लिंटन, प्रिन्स चार्ल्स आणि जॉर्ज बुश या परदेशी नेत्यांना देण्यात आला आहे. त्याचवेळी पीएम मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर दोन्ही देशांमधील संभाषणाची पोस्ट केली. पंतप्रधानांनी लिहिले: कुवेतच्या अमीरांसोबत छान भेट झाली. आम्ही फार्मास्युटिकल्स, आयटी, फिनटेक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा या मुद्द्यांवर चर्चा केली. आम्ही आमची भागीदारी धोरणात्मक पातळीवर नेली आहे आणि मला आशा आहे की आमची मैत्री आगामी काळात आणखी घट्ट होईल.

---

# मतदानाचे फुटेज फक्त उमेदवारच पाहू शकतील !

## फुटेजशी छेडछाड करून बनावट कथा पसरवल्या जाऊ शकतात

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही, वेबकास्टिंग फुटेज आणि उमेदवारांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग यासारखी इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे सार्वजनिक करणे टाळण्यासाठी सरकारने निवडणूक नियम बदलले आहेत. त्यांचा गैरवापर होण्याच्या भीतीने सरकारने हे पाऊल उचलले आहे.**

अधिकाऱ्यांनी सांगितले की, एआयच्या वापराने मतदान केंद्राच्या सीसीटीव्ही फुटेजशी छेडछाड करून बनावट कथा पसरवल्या जाऊ शकतात. बदलानंतरही हे उमेदवारांना उपलब्ध राहतील. इतर ते मिळविण्यासाठी न्यायालयात जाऊ शकतात. निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसार, कायदा मंत्रालयाने शुक्रवारी निवडणूक आचार नियम-1961 च्या नियम 93(2)(A) मध्ये बदल केले. नियम ९३ म्हणतो- “निवडणुकीशी संबंधित सर्व कागदपत्रे सार्वजनिकरीत्या उपलब्ध असतील.” ते बदलून “निवडणुकीशी संबंधित सर्व कागदपत्रे ‘नियमांनुसार’ सार्वजनिकरित्या उपलब्ध असतील.” केले आहे. पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात याचिकाकर्त्यासोबत हरियाणा विधानसभा




निवडणुकीशी संबंधित कागदपत्रे शेअर करण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये नियम ९३(२) अंतर्गत सीसीटीव्ही फुटेजचाही विचार करण्यात आला. मात्र, या नियमात इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डचा समावेश नसल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले होते. ही संदिग्धता दूर करण्यासाठी नियमात बदल करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, नामनिर्देशन फॉर्म, निवडणूक प्रतिनिधींची नियुक्ती, निवडणूक निकाल आणि निवडणूक खाते विवरण यासारखी कागदपत्रे निवडणूक आचार नियमांमध्ये नमूद केली आहेत. आचारसंहितेदरम्यान, सीसीटीव्ही फुटेज, वेबकास्टिंग फुटेज आणि उमेदवारांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग यांसारखे इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे त्याच्या कक्षेत येत नाहीत. निवडणूक आयोगाच्या एका माजी अधिकाऱ्याने सांगितले की, सीसीटीव्ही कव्हरेज आणि मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग निवडणूक आचार नियमांतर्गत केले जात नाही.

### सरकारने निवडणूक नियम बदलले

आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत, ज्यात नियमांचा हवाला देऊन इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड मागवण्यात आले होते. दुरुस्ती हे सुनिश्चित करते की केवळ नियमांमध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे सार्वजनिक आहेत. नियमात नमूद नसलेली इतर कागदपत्रे सार्वजनिक करण्याची परवानगी देऊ नये.मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही, वेबकास्टिंग फुटेज आणि उमेदवारांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग यासारखी इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे सार्वजनिक करणे टाळण्यासाठी सरकारने निवडणूक नियम बदलले आहेत.

# वरुण धवनच्या घरात घुसली होती चाहती

बॉलीवूडचा 'चॉकलेट बॉय' म्हणून ओळखला जाणारा वरुण धवन सध्या 'बेबी जॉन' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ॲटली दिग्दर्शित 'बेबी जॉन' चित्रपट २५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात वरुण धवनसह अभिनेते जॅकी श्रॉफ, कीर्ति सुरेश, वामिका गब्बी, सान्या मल्होत्रा आणि राजपाल यादव महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. हा ॲक्शन ड्रामा पाहण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत. बॉक्स ऑफिसवर एकाबाजूला 'पुष्पा २' चित्रपट धुमाकूळ घालत असताना 'बेबी जॉन' चित्रपटाला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतोय? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.'बेबी जॉन' या चित्रपटाचं सध्या जोरदार प्रमोशन सुरू आहे. ठिकठिकाणी जाऊन चित्रपटातील कलाकार मंडळी प्रमोशन करत आहेत. काही दिवसांपूर्वी 'बेबी जॉन' चित्रपटाच्यानिमित्ताने वरुण धवनने रणवीर अलाहाबादिया मुलाखत दिली. यावेळी त्याने एका चाहतीचा किस्सा सांगितला; जी अभिनेत्याच्या घरात घुसली होती.वरुण धवनने चाहत्यांचे हैराण करणारे किस्से सांगितले. यावेळी घरात घुसलेला चाहतीचा किस्सा अभिनेत्याने सांगितला. तो म्हणाले, "माझ्या घरात एका पॉवरफुल व्यक्तीची पत्नी घुसली होती. त्यावेळी मी कुठल्या मनस्थितीत होतो, हे मी सांगू शकत नाही. पण तिचा पती खूप पॉवरफुल व्यक्ती होती. पण त्याच्या पत्नीचा दुसऱ्यांना फसवण्यासाठी वापर केला जात होता."पुढे वरुण धवन म्हणाला, "त्या चाहतीशी माझ्या नावाने कोणीतरी बोलत असायचं. तिला माझ्या घराबाबत सर्व काही माहीत होतं आणि तिला वाटतं होतं की, मी माझ्या कुटुंबाला सोडत आहे. हे खूप भयानक होतं. त्यानंतर मी पोलिसांना बोलावलं. पण, ती एका व्यक्तिबरोबर घरी आली होती आणि मग कौटुंबिक वाद झाला. महिला कॉन्स्टेबलला बोलावलं. त्यानंतर सर्व वातावरण शांत झालं."दरम्यान, वरुण धवनसाठी घर सोडून तीन रात्र समुद्र किनारी झोपणारे चाहते त्याला भेटले आहेत. यावेळी देखील त्याने पोलिसांची मदत घेतली होती. एकेदिवशी एका चाहतीने जबरदस्तीने वरुण धवनला किस केली होती. एवढंच नव्हे तर दुसऱ्या एका चाहतीने थेट फोन नंबरही मागितला होता.

# साराने दाखवली केदारनाथची झलक!



बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आहे. आपले सिनेमे आणि अभिनयाच्या माध्यमातून तिने प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन केलं आहे. व्यावसायिकसह वैयक्तिक आयुष्यातील सर्व अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करत असते. साराला फिरण्याची प्रचंड आवड आहे. त्यामुळे भटकंती करतानाचे फोटो आणि व्हिडीओ ती चाहत्यांसोबत शेअर करत असते. सारा अली खान आता केदारनाथ यात्रेला पोहोचली आहे. सारा अली खानने सोशल मीडियावर केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सारा अली खान लोकल ठिकाणी जेवण करताना दिसत आहे. दरम्यान तेथील एका साधुंचे ती आशीर्वाद घेत आहे. तसेच एका नदीकिनारी ती चेहऱ्यावर पाणी मारताना पाहायला मिळत आहे. त्यावेळी ती म्हणत आहे,"सकाळी-सकाळी थंड पाणी चेहऱ्यावर मारा बुद्धी तेज होईल". एकंदरीतच सारा अली खानचा केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. साराने या व्हिडीओच्या बॅकग्राऊंडला 'केदारनाथ' सिनेमातील काफीराना गाणं लावलं आहे. सारा अली खानचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. केदारनाथ यात्रेदरम्यानचे साराचे फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरले आहेत. पण हा व्हिडीओ पाहिल्यानंतर चाहत्यांना मात्र सुशांत सिंह राजपूतची आठवण आली आहे. सारा अली खानने शेअर केलेल्या व्हिडीओवर चाहते,"ईस्ट असो वा वेस्ट सारा अली खान बेस्ट आहे, व्हा दीदी सुशांत सिंह राजपूतची आठवण आली, काफीराना गाणं ऐकल्यानंतर सुशांतची आठवण आली नाही असं होत नाही, हर हर महादेव, अशा कमेंट्स करत आहेत.

# बच्चन यांची खास पोस्ट

धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलच्या वार्षिक कार्यक्रमाला बॉलीवूडच्या अनेक कलाकारांनी हजेरी लावल्याचे दिसले. यामध्ये करिना कपूर, सैफ अली खान, शाहिद कपूर, बॉलीवूडचा किंग खान म्हणजेच शाहरूख खान याबरोबरच अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय बच्चन व अभिषेक बच्चन असे अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. या शाळेत या कलाकारांची मुले शिक्षण घेत असून त्यांचा परफॉर्मन्स पाहण्यासाठी हे कलाकार आ ले होते. कार्यक्रमाच्या दोन्ही दिवशी हे कलाकार हजर राहिले. ऐश्वर्या राय बच्चन व अभिषेक बच्चन त्यांच्या मुलीला आराध्याला प्रोत्साहन देण्यासाठी आले होते. पहिल्या दिवशी अमिताभ बच्चनदेखील हजर राहिले होते. तर कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी ऐश्वर्या-अभिषेक अभिनेत्रीच्या आईसह हजर राहिल्याचे दिसले.अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉगमध्ये या कार्यक्रमाचा अनुभव लिहित मुलांचे कौतुक केले आहे. बीग बींनी लिहिले, "मुले, त्यांची निरागसता आणि त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत सर्वोत्तम परफॉर्मन्स करण्याची इच्छा. जेव्हा ते हजारो लोकांच्या सहवासात तुमच्यासाठी परफॉर्म करत असतात, तेव्हा तो सर्वात आनंददायक अनुभव असतो."

# मृणालचा आनंद गगनात मावेना

अभिनेत्री मृणाल ठाकूर सोशल मीडियावर सक्रिय असते. ती अनेकदा तिचे अनेक लहान व्हिडीओज, रिल्स सोशल मीडियावर शेअर करत असते. मृणाल या रिल्स शूटिंग सेटवर, किंवा मेकअप रूममध्ये असताना मिळणाऱ्या वेळात शेअर करते. याच रिल्समधून ती अनेकदा हलकेफुलके क्षण शेअर करते. यात ती कधी मराठी गाणी म्हणते, कधी अहिराणी भाषेत बोलते तर कधी तिच्या सहकाऱ्यांबरोबर गमतीदार व्हिडीओ शेअर करते. आता मृणालने असाच एक नवी रील शेअर केली आहे. मृणालने नवी रील इन्स्टाग्राम स्टोरीवर पोस्ट केली आहे.



# कुणीतरी येणार येणार गं!



संकेत भोसले आणि अभिनेत्री सुगंधा मिश्रा (SUGANDHA MISHRA) हे कपल सध्या चर्चेत आहे. या जोडप्याच्या घरी लवकरच एका चिमुकल्या पाहुणाचे आगमन होणार आहे.नुकताच सुगंधाचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला सुगंधा आणि संकेत यांच्या कुटुंबाने तसेच त्यांच्या जवळच्या मित्रमैत्रिणींनी हजेरी लावली. सुगंधाच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी सोशल मीडियावर डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोला त्यांनी कॅप्शन दिलं, "आमचा बेबी शॉवर कार्यक्रम हा महाराष्ट्रीयन पारंपारिक पद्धतीने (डोहाळे जेवण) पार पडला. ओटी भरण, पूजा आणि बर्फी पेडा कार्यक्रम इत्यादी गोष्टी पार पडल्या. तसेच केक कटिंग देखील करण्यात आलं, डायपर चेंजिंग सारखे मजेशीर खेळ देखील आम्ही खेळलो." पुढे त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं, "आम्ही एका स्पेशल गाण्यावर परफॉर्म देखील केलं."

# तुझ्या बॉलने सर्वांनाच बोल्ड केले!

## अश्विनच्या निवृत्तीनंतर पंतप्रधान मोदींचे भावनिक पत्र

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा आघाडीचा फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने ऑस्ट्रेलिया विरुद्ध सुरु असलेल्या कसोटी मालिकेच्या मध्यातच अचानक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. त्याने ब्रिसबनमध्ये झालेल्या तिसऱ्या कसोटी सामान्याच्या शेवटच्या दिवशी निवृत्त होण्याची घोषणा केली. अश्विनच्या या तडकाफडकी निर्णयाने लाखो क्रिकेट चाहत्यांना धक्का बसला आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अश्विनला पत्र लिहित, निवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या आहे.**






१४ वर्षे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अश्विनने अनेकदा भारताला एकहाती विजय मिळवून दिले आहेत. याचबरोबर कसोटी क्रिकेटमध्ये त्याने आपली वेगळी छाप सोडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविचंद्रन अश्विनला लिहिलेल्या पत्रात, त्याच्या अविश्वसनिय कारकिर्दीचे कौतुक केले. याचबरोबर अश्विनच्या फलंदाजांना त्याच्या गोलंदाजीतील वैविध्याने चकवण्याच्या आणि त्यांच्यावर वर्चस्व गाजवण्याच्या क्षमतेचेही कौतुक केले आहे.प्रिय अश्विन, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त घेण्याच्या तुझ्या घोषणेने भारतातील आणि जगभरातील चाहत्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. प्रत्येकजण आणखी अनेक ऑफ-ब्रेकची (ऑफ स्पिन) अपेक्षा करत असताना, तू कॅरम बॉल टाकत सर्वांनाच बोल्ड केले.अश्विनच्या आंतराष्ट्रीय क्रिकेटमधील विकेट्सविषयी लिहिताना पंतप्रधान म्हणाले, "तू सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये घेतलेल्या ७६५ आंतरराष्ट्रीय विकेट्सपैकी प्रत्येक विकेट खास होती. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक मालिकाविराचे पुरस्कार जिंकत कसोटी संघाच्या यशात तुझे किती योगदान होते हे दाखवून दिले आहे." "कमी वयात कसोटी क्रिकेटच्या पदार्पण केल्यानंतर पहिल्याच सामन्यात पाच बळी पटकावले आणि पुढे २०११ मध्ये विश्वचषक विजेत्या संघात स्थान मिळवले. त्यानंतर २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्याच्या अंतिम षटकात भारताला रोमहर्षक विजय मिळवून देत, संघाचा प्रमुख सदस्य झाला. पुढे आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत आयसीसीचा वर्षातील सर्वोत्तम क्रिकेटपटूच्या पुरस्कारासह क्रिकेट विश्वात मोठे नाव केले."रविचंद्रन अश्विनने आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये १०६ सामन्यात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. यामध्ये त्याने ५३७ विकेट पटकावल्या आहेत. अश्विनच्या नावावर ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा जास्त विकेट आहेत. याचबरोबर त्याने ८ वेळा कसोटी सामन्यात १० विकेट्स मिळवल्या आहेत. याचबरोबर भारतासाठी अश्विनने १५६ एकदिवसीय विकेट्सही घेतल्या आहेत. अश्विनच्या नावावर टी-२० क्रिकेटमध्ये मध्ये ७२ विकेट्स आहेत. त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये मिळून ७६५ विकेट्स घेतल्या आहेत. अश्विनने फलंदाज म्हणूनही आपली छाप सोडली. कसोटी क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ६ शतकांसह ३५०३ धावा आहेत.१४ वर्षे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अश्विनने अनेकदा भारताला एकहाती विजय मिळवून दिले आहेत. याचबरोबर कसोटी क्रिकेटमध्ये त्याने आपली वेगळी छाप सोडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविचंद्रन अश्विनला लिहिलेल्या पत्रात, त्याच्या अविश्वसनिय कारकिर्दीचे कौतुक केले. याचबरोबर अश्विनच्या फलंदाजांना त्याच्या गोलंदाजीतील वैविध्याने चकवण्याच्या आणि त्यांच्यावर वर्चस्व गाजवण्याच्या क्षमतेचेही कौतुक केले आहे.प्रिय अश्विन, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याच्या तुझ्या घोषणेने भारतातील आणि जगभरातील चाहत्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

### अश्विनची कसोटी कारकीर्द

प्रत्येकजण आणखी अनेक ऑफ-ब्रेकची (ऑफ स्पिन) अपेक्षा करत असताना, तू कॅरम बॉल टाकत सर्वांनाच बोल्ड केले. अश्विनच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील विकेट्सविषयी लिहिताना पंतप्रधान म्हणाले, "तू सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये घेतलेल्या ७६५ आंतरराष्ट्रीय विकेट्सपैकी प्रत्येक विकेट खास होती. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक मालिकाविराचे पुरस्कार जिंकत कसोटी संघाच्या यशात तुझे किती योगदान होते हे दाखवून दिले आहे." "कमी वयात कसोटी क्रिकेटच्या पदार्पण केल्यानंतर पहिल्याच सामन्यात पाच बळी पटकावले आणि पुढे २०११ मध्ये विश्वचषक विजेत्या संघात स्थान मिळवले. त्यानंतर २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्याच्या अंतिम षटकात भारताला रोमहर्षक विजय मिळवून देत, संघाचा प्रमुख सदस्य झाला. पुढे आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत आयसीसीचा वर्षातील सर्वोत्तम क्रिकेटपटूच्या पुरस्कारासह क्रिकेट विश्वात मोठे नाव केले.

# जडेजाची हिंदीत उत्तरं; मीडियाचा संताप

## रवींद्र जडेजावर ऑस्ट्रेलियाची माध्यमं का नाराज झाली?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेटपटू रवींद्र जडेजावर ऑस्ट्रेलियातली प्रसारमाध्यमं भडकली आहेत. कारण गुरुवारी मेलबर्न या ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदेत रवींद्र जडेजाला जे प्रश्न विचारण्यात आले त्याची उत्तरं त्याने हिंदीत दिली आहेत. यानंतर ऑस्ट्रेलियाच्या माध्यमांनी संताप व्यक्त करत आमच्या इंग्रजी प्रश्नांची उत्तरं जडेजाने इंग्रजीत द्यायला नकार दिला असं म्हटलं आहे.**




रवींद्र जडेजाने जी पत्रकार परिषद घेतली ती झाल्यावर तो परतला. मात्र त्याचवेळी ऑस्ट्रेलियाच्या एका पत्रकाराने संताप व्यक्त केला आणि तो म्हणाला, रवींद्र जडेजाने आमच्या इंग्रजी प्रश्नांची उत्तरं इंग्रजी भाषेत दिली नाहीत. भारतीय मीडिया मॅनेजरने त्या पत्रकाराला सांगितलं की आज झालेली पत्रकार परिषद ही खासकरुन भारतीय मीडियासाठी आयोजित करण्यात आली होती. मात्र ऑस्ट्रेलियन पत्रकाराने ते मान्य केलं नाही. त्याने संताप व्यक्त केल्याने हा वाद निर्माण झाला. रवींद्र जडेजाने हिंदीत उत्तरं दिल्याने वाद निर्माण झाला.रवींद्र जडेलाला विचारण्यात आलं की अश्विनच्या निवृत्तीनंतर तू एकटा पडला आहेस असं तुला वाटतं का? त्यावर तो म्हणाला, "अश्विन माझा ऑन फिल्ड मेंटॉर होता. आम्ही दोघांनीही अनेक सामने खेळले आहेत. आम्ही सामन्यात काय स्थिती निर्माण होते त्यानुसार पुढची रणनीती ठरवायचो. मला अश्विनची कमतरता भासते आहे. मात्र आता तरुण खेळाडूंकडे संधी आहे. भारतासाठी खेळून ते उत्तम कामगिरी करतील."अश्विन क्रिकेटमधून संन्यास घेईल.

### आणखी काय म्हणाला जडेजा?

मला निर्णय घेण्याआधी त्याने फक्त पाच मिनिटांपूर्वी सांगितलं होतं. चौथ्या कसोटी आघाडीच्या आणि मधल्या फळीकडून ही अपेक्षा पूर्ण केली जाईल अशा आशा बाळगून जडेजा म्हणाला,"एक संघ म्हणून कामगिरी करण्यासाठीदेखील आघाडीच्या फळीची जबाबदारी मोठी असते. जर, प्रत्येकाने फलंदाजीत आपले योगदान दिले, तर धावफलकावर एक चांगली धावसंख्या उभी राहते. तिसऱ्या कसोटी सामान्यात केवळ केएल राहुलला आपली छाप पाडता आली होती. त्याच्याखेरीज एकही फलंदाज खेळपट्टीवर स्थिरावू शकला नव्हता.